# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 11 April 2025

## Time: 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १४ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

संसद भवन परिसरात प्रेरणा स्थळ इथं बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरीवंश, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातल्या इतर सदस्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरच्या संदेशात, डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केलं. त्यांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करण्यासाठी समर्पित वृत्तीनं कार्यरत आहे. त्यांची तत्व आणि आदर्श हे आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देईल, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर, तसंच नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर हजारो अनुयायी दाखल झाले आहेत. त्यांच्या सोयी-सुविधेसाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमीवर बाबासाहेबांना अभिवादन केलं.

मुंबई महानगर प्रदेशचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार

यांनी काल दादर इथल्या इंदू मिल परिसरातल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक प्रकल्पाचा आढावा घेतला. हे स्मारक वेळेत पूर्ण व्हावं, तसंच ते डॉ. आंबेडकर यांच्या अजरामर कार्याला साजेसं गौरवचिन्ह ठरावं, अशी अपेक्षा मुखर्जी यांनी यावेळी व्यक्त केली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज हरियाणाच्या दौर्यावर असून, विविध विकासकामांचं लोकार्पण त्यांच्या हस्ते होत आहे. हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेची सुरुवात, तसंच हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते झालं. याशिवाय यमुनानगर इथं दीनबंधू छोटूराम औष्णिक वीज केंद्राच्या ८०० मेगावॅट आधुनिक औष्णिक वीज प्रकल्पाची, भारतमाला परियोजनेअंतर्गत सुमारे १७० कोटी रुपये किमतीच्या सुमारे साडे चौदा किलोमीटर रेवाडी बाह्य वळणमार्गाचं उद्घाटनही पंतप्रधान करणार आहेत.

****

फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याला बेल्जियम पोलिसांनी अटक केली. पंजाब नॅशनल बँक कर्ज घोटाळा प्रकरणात ही अटक झाली. केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयची विनंती आणि मुंबईतल्या एका न्यायालयाकडून दोन अटक वॉरंटच्या आधारे बेल्जियम पोलिसांनी ही कारवाई केली. जानेवारी २०१८ मध्ये मेहुल चोकसी भारतातून फरार झाला होता.

****

नागपूर इथल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी एनएडीटीमध्ये भारतीय महसूल सेवा – आयआरएस ७७ व्या तुकडीतील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा प्रशिक्षणाचा समारोप केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. रॉयल भूतान सेवेच्या दोन अधिकाऱ्यांसह ८४ अधिकारी प्रशिक्षणार्थींनी १६ महिन्यांचं सेवा पूर्वप्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलं.

****

गडचिरोली पोलिसांनी काल आत्मसमर्पित नक्षलवाद्यांसाठी विपश्यना शिबिराचं आयोजन केलं होतं. या शिबिरात हिंसेचा मार्ग सोडून आत्मसमर्पण केलेल्या १०२ जणांनी सहभागी होऊन ध्यानसाधनेद्वारे मनशुद्धी आणि जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे धडे गिरवले.

****

बीड जिल्हा रुग्णालयात काल एका महिलेचा प्रसूतीनंतर तासाभरातच रक्तस्त्रावाने मृत्यू झाला. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून, याप्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. उत्तरीय तपासणीनंतर जो अहवाल येईल, त्यानुसार कारवाई करण्यात येईल, असं जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत यांनी सांगितलं.

****

अमेरिकेत सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात पुरुष रिकर्व सांघिक स्पर्धेत भारतीय संघानं रौप्य पदक जिंकलं. काल ऑबर्नडेल इथं झालेल्या अंतिम फेरीत, धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप रॉय आणि अतनु दास यांच्या संघाला, चीन च्या संघाकडून पराभव पत्करावा लागला. या सत्रात भारताचं हे तिसरं पदक आहे. धीरज बोम्मादेवरा आज पुरुष रिकर्व वैयक्तिक प्रकारात खेळणार आहे.

****

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या वतीनं पुण्यात आयोजित फिडे महिला बुद्धिबळ स्पर्धेच्या पाचव्या टप्प्याचं, काल अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाचे अध्यक्ष नितीन नारंग यांच्या हस्ते उद्घाटन झालं. २४ एप्रिलपर्यंत ही स्पर्धा सुरू राहणार आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या येवला आणि निफाड तालुक्यात काल अवकाळी पाऊस झाला. अनेक ठिकाणी उन्हाळ कांदा काढणी सुरू आहे; त्यातच अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची एकच धांदल उडाली. येवल्यात राजापूर, पन्हाळसाठे परिसरामध्ये गारांचा पाऊस पडल्याने काढून ठेवलेला कांदा भिजला आहे.

जळगाव जिल्ह्यात रावेर, मुक्ताईनगर, बोदवडमध्येही वादळी वारे, गारपीट आणि पावसामुळे शेतपिकांचं नुकसान झालं. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.

****